**ठळक बातम्या**

- भारत - अमेरिका व्यापार समझोता आणि भारत - पाकिस्तान दरम्यान मध्यस्थीसाठी अमेरिकेबरोबर कोणत्याही पातळीवर कधीही चर्चा झाली नव्हती असं प्रधानमंत्र्यांचं स्पष्ट प्रतिपादन
- जी-सेव्हन परिषदेत भाग घेतल्यानंतर प्रधानमंत्री कॅनडाहून क्रोएशियाची राजधानी झाग्रेब साठी रवाना
- राष्ट्रीय महामार्गांवर टोल भरण्यासाठी तीन हजार रुपयांचा वार्षिक फास्टॅग पास येत्या १५ ऑगस्टपासून मिळणार

**आणि**

- एक्सिऑम - फोर या अंतराळयानाचं उड्डाण येत्या २२ जूनला

**<><><><><>**

भारत - अमेरिका व्यापार समझोता आणि भारत - पाकिस्तान दरम्यान मध्यस्थीसाठी अमेरिकेबरोबर कोणत्याही पातळीवर कधीही चर्चा झाली नव्हती असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांना स्पष्ट सांगितलं आहे. परराष्ट्र विभागाचे सचिव विक्रम मिसरी यांनी सांगितलं की प्रधानमंत्री मोदी यांची अमेरिकेच्या अध्यक्षांबरोबर जवळजवळ ३५ मिनिटं दूरध्वनीवरुन चर्चा झाली. त्यावेळी मोदी यांनी स्पष्ट केलं की भारत- पाकिस्तान दरम्यान पाकिस्तानच्या विनंतीवरुन थेट सेनादल पातळीवर चर्चा झाली होती. भारताने आजवर कधीही त्रयस्थांची मध्यस्थी स्वीकारलेली नाही आणि यापुढेही स्वीकारणार नाही, याचा पुनरुच्चार मोदी यांनी केला. या संभाषणात त्यांनी ट्रंप यांना ऑपरेशन सिंदूर विषयी माहिती दिली.

**<><><><><>**

कॅनडामधील कनानास्किस इथं झालेल्या जी-सेव्हन संपर्क शिखर परिषदेच्या वेळी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जी-सेव्हन नेत्यांसोबत प्रमुख जागतिक आव्हानं आणि सामायिक आकांक्षांवर चर्चा केली. बदलत्या जगात भविष्यातली ऊर्जा सुरक्षितता, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा आणि गुंतवणूकीच्या जी-सेव्हन चर्चेत त्यांनी भाग घेतला. शाश्वत आणि हरित मार्गानं सर्वांसाठी ऊर्जा सुरक्षिततेची खात्री करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली आणि या करता आंतरराष्ट्रीय सौर आघाडी, आपत्ती प्रतिरोधक पायाभूत सुविधा परिषद आणि जागतिक जैव इंधन आघाडी यासारख्या भारताच्या जागतिक उपक्रमांवर सविस्तर चर्चा केली. विकसनशील देशांसमोरची आव्हानं विशद करुन त्यांनी सांगितलं की भारतानं या देशांचा आवाज जागतिक व्यासपीठावर पोहोचवण्याची जबाबदारी घेतली आहे. जी-सेव्हन शिखर परिषदेत प्रधानमंत्री मोदी सलग सहाव्यांदा सहभागी झाले.

कॅनडाचा दौरा आटोपून  प्रधानमंत्री क्रोएशियाला रवाना झाले.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपला कॅनडा दौरा आटोपून आज दुपारी क्रोएशियाची राजधानी झाग्रेब इथे पोहोचतील. या दौऱ्यात धोरणात्मक सहकार्यावर द्विपक्षीय चर्चा होण्याची अपेक्षा आहे. यात शिष्टमंडळ पातळीवरची चर्चा, प्रमुख क्षेत्रांमध्ये करार आणि राजकीय-सांस्कृतिक कूटनीती यांचा समावेश असेल. या दौऱ्या दरम्यान, भारत आणि क्रोएशिया दरम्यान, विज्ञान आणि तंत्रज्ञान, कृषी, शिक्षण आणि संस्कृती या क्षेत्रातल्या प्रमुख करारांवर स्वाक्षऱ्या होण्याची शक्यता आहे. तसंच, २०३० पर्यंत सांस्कृतिक देवाणघेवाण कार्यक्रमाच्या विस्ताराबाबत एक करार होईल. या करारात कला, संग्रहालयं, पुरातत्वशास्त्र आणि माध्यमांचा समावेश असेल. त्याशिवाय झाग्रेब विद्यापीठात हिंदी भाषेच्या प्रसारासाठीही तरतूद असेल.

<><><><><>

वाणिज्य मंत्री पियूष गोयल आज दोन दिवसांच्या यूनायटेड किंग्डमच्या दौऱ्यासाठी रवाना झाले. भारत आणि यूके यांच्या दरम्यान मुक्त व्यापार करार पूर्ण करण्याच्या दोन्ही देशांच्या प्रधानमंत्र्यांनी केलेल्या घोषणेच्या पार्श्वभूमीवर हा दौरा होत आहे. वाणिज्य मंत्रालयाने आपल्या निवेदनात म्हटलं आहे की, या दौऱ्यात पियूष गोयल हे ब्रिटनचे व्यवसाय आणि व्यापार मंत्री जोनाथन रेनॉल्ड्स यांच्याबरोबर द्विपक्षीय बैठक घेतील.

<><><><><>

इस्राएलबरोबरच्या युद्धात इराणने बिनशर्त शरणागती पत्करावी असा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. इराणचे सर्वोच्च नेते अली खमेनी कुठे लपले आहेत याची माहिती अमेरिकेला आहे, मात्र निष्पाप नागरिक आणि अमेरिकन सैनिक यांच्या सुरक्षेचा विचार करुन सद्यस्थितीत अमेरिका थेट कारवाई करु इच्छित नाही असं ट्रंप यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. जी-सेव्हन परिषदेतून लवकर माघारी परतलेल्या ट्रम्प यांनी तेहरानमधील साडेनऊ दशलक्ष रहिवाशांना तेहरानमधून बाहेर पडण्याचे आवाहन केल्याच्या पार्श्वभूमीवर हे संदेश प्रसारीत केले आहेत. इराणचे राष्ट्रप्रमुख अयतुल्लाह खमेनी यांनी आता युद्ध सुरु झालंय अशा शब्दात ट्रंप यांच्या आवाहनाला समाजमाध्यमावरच्या संदेशाद्वारे प्रतिसाद दिला आहे. इराण इस्रायलला चोख प्रत्युत्तर देईल, इस्रायलप्रति कोणतीही दयामाया दाखवली जाणार नाही, असा थेट इशारा खमेनी यांनी दिला आहे.

<><><><><>

आंतरराष्ट्रीय योग दिवस जगभरात २१ जून रोजी साजरा होणार आहे. यानिमित्त प्राचीन भारतीय संस्कृतीपासून ते त्याच्या जागतिक चळवळीपर्यंतचा योगसाधनेच्या प्रवासाचा आढावा घेऊया..

**व्हॉईस कास्ट**

*( भारतीय संस्कृतीत एक आध्यात्मिक साधना म्हणून योगसाधनेची सुरुवात झाली. आणि हळूहळू आत्म-साक्षात्काराच्या दिशेने एक शिस्तबद्ध मार्ग म्हणून त्याचा विकास झाला. योगसाधनेचा उगम सुमारे ईसापूर्व ५०० सालादरम्यान झाला. कालांतराने, ही साधना एका समृद्ध शाखेत बहरली. ती वेद, उपनिषद आणि नंतर पतंजलीच्या योग सूत्रांमध्ये प्रवाहित झाली. स्वामी विवेकानंद आणि बी.के.एस. अय्यंगार या योगगुरुंनी १९ व्या आणि २० व्या शतकात योगचे पुनरुज्जीवन केलं. २०१४ मध्ये, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत २१ जून हा आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव सादर केला. तेव्हापासून, २१ जून हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. येत्या शनिवारी साजऱ्या होणाऱ्या ११ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची संकल्पना "एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग" ही आहे. जगभरात यादिवशी योगसाधनेवर आधारित अनेक कार्यक्रम होणार आहेत. योगदिनानिमित्त विशाखापट्टणम इथं होणाऱ्या कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उपस्थित राहणार आहेत. )*

**<><><><><>**

महामार्गांवरचा प्रवास सुलभ करण्याच्या उद्देशानं येत्या १५ ऑगस्टपासून वार्षिक फास्टॅग पास सुरू करायचा निर्णय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयानं घेतला आहे. मंत्री नितीन गडकरी यांनी आज समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे ही माहिती दिली. तीन हजार रुपये किंमतीचा हा पास एका वर्षाच्या कालावधीसाठी किंवा २०० फेऱ्या यापैकी आधी संपणाऱ्या कालावधीपुरता असेल. भाड्याच्या वाहनांना ही सुविधा मिळणार नाही. यासाठीची लिंक लवकरच राजमार्ग यात्रा ॲप

आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, तसंच रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या अधिकृत संकेतस्थळांवर उपलब्ध होणार असल्याचंही गडकरी यांनी सांगितलं.

<><><><><>

भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांना अंतराळात घेऊन जाणाऱ्या एक्सिऑम - फोर या अंतराळयानाचं उड्डाण येत्या २२ जूनपर्यंत पुढं ढकलण्यात आलं आहे. नासा या अमेरिकन अंतराळ संस्थेला अंतराळ प्रयोगशाळेच्या दुरुस्तीच्या कामाची तपासणी करायची असल्यानं हे उड्डाण पुढं ढकलण्यात आल्याचं ॲक्सिऑम स्पेस कंपनीनं म्हटलं आहे. नवीन तारीख, उड्डाणासाठीच्या सर्व निकषांची तपासणी करुन ठरवली असल्याची माहिती केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी दिली आहे.

<><><><><>

आंध्र प्रदेशात अल्लुरी सीतारामा राजू जिल्ह्यातल्या कोंडामोडलू वनक्षेत्रात सुरक्षा कर्मचारी आणि सशस्त्र माओवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत आज तीन माओवादी नेते ठार झाले. विशेष क्षेत्रीय माओवादी समिती सदस्य अरुणा, केंद्रीय माओवादी समिती सदस्य गजर्ला रवी उर्फ उदय आणि एओबी विशेष क्षेत्रीय माओवादी समितीची सदस्य अंजू हे माओवादी या चकमकीत ठार झाले. सुरक्षा कर्मचाऱ्यांनी घटनास्थळावरून तीन एके-४७ रायफल जप्त केल्या आहेत.

<><><><><>

समावेशक विकासाची ११ वर्षं या संकल्पनेवर आधारित ‘वार्ता’ या माध्यम कार्यशाळेचं आयोजन पत्र सूचना कार्यालयाच्या मुंबई प्रादेशिक कार्यालयानं आज केलं आहे. नवी मुंबई परिसरात काम करणारे माध्यम प्रतिनिधी यात सहभागी झाले आहेत. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या पश्चिम विभागाच्या महासंचालक स्मिता

वत्स-शर्मा यांच्यासह केंद्र आणि राज्य सरकारचे वरिष्ठ अधिकारी यात माध्यम प्रतिनिधींना मार्गदर्शन करणार आहेत.

**<><><><><>**

इंग्लंडविरोधात होणाऱ्या कसोटी क्रिकेट मालिकेसाठी भारतीय संघात जलदगती गोलंदाज हर्षित राणा याचा राखीव खेळाडूंमधे समावेश झाला आहे. बीसीसीआय अर्थात भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं काल रात्री ही घोषणा केली. हर्षित राणाने ऑस्ट्रेलियाच्या विरुद्ध कसोटी क्रिकेटमधे पदार्पण केलं होतं. त्याने आतापर्यंत दोन कसोटी, पाच एकदिवसीय आणि एक टी ट्वेंटी सामना खेळला आहे.

इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय संघाचं नेतृत्व शुभमन गिल करणार असून संघात ऋषभ पंत, यशस्वी जायसवाल, के एल राहुल, साई सुदर्शन, अभिमन्यु ईश्वरन, करुण नायर, नितीश रेड्डी, रवींद्र जडेजा, ध्रुव जुरेल, वाशिंग्टन सुंदर, शार्दुल ठाकुर, जसप्रीत बुमराह, मोहम्मद सिराज, प्रसिद्ध कृष्णा, आकाश दीप, अर्शदीप सिंह, कुलदीप यादव यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

जर्मनी इथे होणाऱ्या ४ राष्ट्रांच्या हॉकी स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आज भारताचा कनिष्ठ पुरुष हॉकी संघ बेंगळुरूहून रवाना झाला. कर्णधार अराईजित सिंह हुंडल याच्या नेतृत्वाखाली हा संघ येत्या २१ जून रोजी यजमान जर्मनी संघाबरोबर लढत देईल. त्यानंतर २२ जून रोजी ऑस्ट्रेलिया आणि २४ जून रोजी स्पेनशी या संघाचा सामना होणार आहे.